# त्यांच्या अंधःकारमय जीवनात प्रकाशाचे रंग भरूया

माझ्या दिराचं नुकतच आकस्मिक निधन झालं. त्यांच्या १७ वर्षांच्या मुलीनं आम्हाला आठवण करून दिली की बाबांनी नेत्रदानाचा संकल्प केला होता. आम्ही सर्व या अकल्पित धक्क्याने कोलमडलो होतो परंतु या कोवळ्या मुलीच्या स्मरणात बाबांची अखेरची इच्छा राहिलेली पाहून आम्हाला तिचं खरोखरच कौतुक वाटलं. अशाच एका वृद्ध आजीचं अचानक निधन झालं. त्यांना स्वतःला आपण आणखी काही वर्षेनक्की जगू अशी खात्री होती. परंतु एका छोट्याशा शस्त्रक्रियेने त्यांचा घात केला. त्यांची सुद्धा नेत्रदान, देहदान करण्याची मनस्वी इच्छा होती. तसा त्यांनी अर्ज भरून संकल्पही केला होता.

या दोनही घटनांमध्ये मृत्यूनंतर बराच कालावधी गेल्याने तसेच मृतदेहाची योग्य ती काळजी न घेतल्याने त्यांचा संकल्प पूर्ण होऊ शकला नाही. आपल्या अगदी जवळच्या प्रिय व्यक्तींची शेवटची इच्छा आपण पूर्ण करू शकलो नाही याचं शल्य मात्र आयुष्यभर राहतं.

या घटना पुन्हा आठवण्याचं कारण म्हणजे नुकताच १५ ऑक्टोबर रोजी जागतिक अंध दिन सर्वत्र साजरा केला गेला. १० जून हा जागतिक दृष्टीदान दिन म्हणून आपण साजरा करतो. या दिनाचं महत्व खरं तर आपल्यासारख्या डोळस माणसांना कळणं तसं मुष्किलच! कारण ज्यांची पंचज्ञानेंद्रिये शाबूत आहेत, व्यवस्थित कार्यक्षम आहेत अशा माणसांना आपल्या धडधाकट शरीराची अजिबात फिकीर नसते या कार्यक्षम शरीराचा आपण पुरेपूर वापर करतो का? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःच्या मनाला विचारून पहा म्हणजे आपल्याला 'डोळस आंधळं' का म्हटलं जातं याचा प्रत्यय येईल.

ज्या व्यक्तींमध्ये एखादं किंवा काही व्यंग असतात उदा. अपंग, मूक-बधीर, अंध इ. अशा व्यक्तींची इतर ज्ञानेंद्रिये अतिशय तीव्र, अधिक कार्यक्षम असतात. अशा व्यक्ती आपल्या शारिरीक व्याधींवर यशस्वी मात करून प्रसंगी कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी यांच्या बळावर एखादं अलौकीक कार्य करून दाखवतात अशी असंख्य उदाहरणं ज्यावेळी समाजात आपल्याला पहायला मिळतात त्यावेळी 'डोळस आंधळ्यांचा' नाकर्तेपणा विशेषत्वाने जाणवतो. कारण अशी माणसं लहानमोठ्या समस्येनं, थोड्याशा नैराश्यानं व्यसनाधीन होणं, आत्महत्या करणं अशा घटना मोठ्या प्रमाणावर दिसून येतात.

जगातील एकूण अंध व्यक्तींच्या ३०% अंधव्यक्ती या भारतातील आहेत. त्यातील ६०% व्यक्ती या १२ वर्षाखालील आहेत. याचाच अर्थ किशोरवयीन मुलांचं प्रमाण जास्त आहे. यात दरवर्षी हजारो अंधांची भर पडतच असते. यामागे कुपोषण तसंच मानवनिर्मित व निसर्गनिर्मित कारणं आहेत. आपल्या निष्काळजीपणामुळे बऱ्याचवेळा अंधत्वाला सामोरं जावं लागतं. अलिकडे कोणताही आनंदोत्सव, मिरवणुका, लग्न हे फटाक्यांच्या आतषबाजीशिवाय पूर्णच होत नाहीत. नुकताच गणपती, नवरात्रौत्सव, दसरा या सणांना, आपण याचा अनुभव घेतलाय. काही दिवसांवर दिव्यांचा, फटाक्यांचा सण दीपावली येऊन ठेपलाय. या आतषबाजीमुळे ध्वनीचं, हवेचं प्रदूषण तर होतच परंतु भाजणं, आग लागणं, अंधत्व येणं या प्रकारच्या घटनाही मोठ्या प्रमाणावर घडतात. अशा वेळी योग्य उपचार व काळजी न घेतल्यास हे अंधत्व कायमस्वरूपी टिकू शकतं.

अशा अंध व्यक्तींना आपण नवजीवन देऊ शकतो. ते केवळ नेत्रदानाने. म्हणूनच नेत्रदान हे रक्तदानाप्रमाणेच सर्वश्रेष्ठ दान आहे. ज्या व्यक्तींना बुब्बुळाच्या आजाराने अंधत्व आलेलं आहे अशा व्यक्तींमध्ये बुब्बुळाचं रोपण केलं जातं. पूर्ण डोळा बसवला जात नाही. ज्या शहरांमध्ये या नेत्रदानाची सोय आहे अशा ठिकाणी मृत्यूनंतर ६ तासांच्या आत नेत्रदान झाले पाहिजे. मृत्यूनंतर मृत व्यक्तीचे डोळे बंद करून त्यावर बर्फ किंवा थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवतात. खोलीतील पंखा, एसी बंद करा. डोक्याखाली २ उशा ठेवा व लागलीच डॉक्टरांशी संपर्क साधा. नेत्रदान प्रक्रिया अवघ्या २० मिनिटांत होते. त्यानंतर पुढील ७२ तासांत अंध व्यक्तींवर नेत्ररोपण शस्त्रक्रिया करावी लागते. ही मोफत केली जाते.

कोणत्याही वयाच्या व्यक्तींना नेत्रदान करता येते. काही गंभीर, संसर्गजन्य आजार, मधुमेह, डोळ्यांचा कर्करोग इ. आजारात नेत्रदान करता येत नाही. मात्र चष्मा असलेल्या, मोतीबिंदू शस्त्रक्रिया झालेल्या व्यक्तींना नेत्रदान करता येतं. 'अंधत्व निवारण' ही राष्ट्रीय समस्या आहे. ती दिवसेंदिवस ज्वलंत होत चाललीय. कारण ज्या प्रमाणात अंधत्व वाढतंय त्या प्रमाणात नेत्रदान होत नाहीये. आपल्या समाजात आजही बऱ्याच अंधश्रद्धा आहेत. त्यामुळे सुशिक्षित माणसेही नेत्रदानाला विरोध करतात. एखादा अवयव दान केल्याने मुक्ती मिळत नाही अशी काही लोकांची अंधश्रद्धा आहे. अशा व्यक्तींना मला विचारावंसं वाटतं की एखाद्या गंभीर आजारात, अपघातात तुम्ही एखादा अवयव काढून टाकता, त्यावेळी या मुक्तीचा विचार करता का?

जन्मापासून अंध असलेल्या व्यक्ती अंधशाळेत जाऊन आपलं शिक्षण, उच्चशिक्षण किंवा एखादी कला आत्मसात करतात परंतु नंतर आलेलं अंधत्व स्विकारणं पालकांना थोडं जड जातं. हे पालक हट्टाने आपल्या मुलांना नॉर्मल शाळेतच ठेवतात. त्यामुळे त्यांची

शैक्षणिक प्रगती खुंटते. ग्रामीण भागामध्ये अशा तऱ्हेचे गैरसमज बऱ्याच प्रमाणात दिसून येतात. अशावेळी डॉक्टरांच्या सल्ल्याने, नेत्रतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने पालकांनी योग्य निर्णय घेणं केव्हाही उत्तम! ४० टक्क्यांच्यावर अंधत्व असलेल्या मुलांना अंध शाळेत प्रवेश दिला जातो.

वाचकहो, पटलं ना तुम्हाला नेत्रदानाचं महत्व! आपल्या नेत्रदानामुळे आपण एकाचवेळी दोन व्यक्तींना हे सुंदर जग पहाण्याची, अनमोल जीवन जगण्याची, त्यांच्या अंधःकारमय जीवनात प्रकाशाचे रंग भरण्याची एक अनमोल संधी देऊ शकतो. मग आजच तुम्ही आपल्या कुटुंबाच्या साक्षीनं नेत्रदानाचा संकल्प करा. आपल्या नजिकच्या शासकीय रूग्णालयाशी संपर्क साधा. अजूनही काही शंका असल्यास आमच्याशी जरूर संपर्क साधा.

–श्रद्धा कळंबटे

संपर्क : हेल्पलाईन स्वयंसेतू

९४२२४३०३६२

Website : www.swayamsetu.org

email id : swayamsetu@gmail.com